



दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०२ ● अंक : ०८६ ● पुणे ● सोमवार, दि. १० फेब्रुवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313






## हिंगणे विठ्ठलवाडी, सिंहगड रोड भागातील प्रगतीचे शिल्पकार

# ॲड. प्रसन्नदादा जगताप

*** वाढदिवस अभिष्टचिंतन विशेष ***

सिंहगड रोड भागातील विकासकामे असो वा नागरिकीकरण व सोयी सुविधा याची प्रचिती सातत्याने ऐकावयास मिळते. मात्र या भागातील खरे प्रगतीचे शिल्पकार म्हणून खरी ओळख व श्रेय ॲड. प्रसन्नदादा घनश्याम जगताप यांनाच जाते.. हक्काचा माणूस म्हणून ओळख असलेले प्रसन्नदादा जनहितार्थ कायमच सेवेत धावून गेले आहेत. गेले 30 वर्षाहून अधिक काळ ह्या भागाचा सुजलाम सुफलाम विकास करण्याचं धोरण ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी राबवले.आणि लाखो नागरिकांचे गळ्यातील ते ताईत बनले.शेतकरी कुटुंबातील एक होतकरू मुलगा, पुढे माजी उपमहापौर ते भविष्यात विधानसभेपर्यंत ही पोहोचू शकतील एवढी जनमाणसामध्ये प्रतिष्ठा त्यांनी कमवल्याचे दिसून येत आहे.. वडील ग्रुप ग्रामपंचायत सरपंच असल्याने राजकीय बाळकडू घरीच मिळालेले दादा कॉलेजवयीन वयापासूनच राजकारणामध्ये रमले. राजकारणामध्ये सेट होण्याच्या अगोदर व्यवसायाकडे लक्ष दिले व नाव कमावले. आणि तिथूनच त्यांच्या राजकारणाची सुरुवात झाली.. नगरसेवक, उपमहापौर, शहर सुधारणा समितीचे अध्यक्ष,पीपल्स को-ऑपरेटिव बँकेवर अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

अष्टपैलू राजकारणी म्हणून त्यांची गणना केली तर नवल वाटू नये. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्येही खडकवासला विधानसभा मतदारसंघातून त्यांनी जोरदार तयारी केली होती. या विधानसभा निवडणुकीमध्ये पक्षाच्या अधिकृत उमेदवारास चांगला प्रचार करत चांगले सहकार्य केले . प्रभागातील दोन्ही मतदारसंघातील उमेदवारांना जास्तीत जास्त मताधिक्य मिळवून दिले..

## जनसामान्याशी थेट जनसंपर्क !

सर्व क्षेत्रांमध्ये पारंगत असलेले प्रसन्नदादा हे कायमच जनसंपर्कात असल्याचे पाहायला मिळते. केवळ प्रभागातील नागरिक न पाहता आजूबाजूच्या सर्व परिसरातील नागरिकांची कामे त्यांच्याकडून होत असल्याने नागरिकांचा ओढा त्यांच्याकडे असतो.

हिंगणे चौकातील जनसंपर्क कार्यालय मध्ये दादा आलेल्या प्रत्येकाची कामे होण्यासाठी प्रयत्न करतात.पक्षविरहित राजकारणाकडेही त्यांचा नेहमी कल असतो..

भारतीय जनता पार्टीच्या कार्यामध्येही दादा कायमस्वरूपी आघाडीवर असल्याचे सातत्याने दिसून येते.

## वरिष्ठांची चांगली ताकद !

ॲड. प्रसन्नदादा जगताप यांचा वरिष्ठांशी घनिष्ठ संबंध असल्यामुळे विकास कामे असो व इतर काही कोणतेही कामे तात्काळ मार्गी लागत असल्यामुळे त्यांची एक चांगली प्रतिमा तयार झाली आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्तही पक्षांच्या सर्व वरिष्ठांशी त्यांचे सलोख्याचे संबंध निर्माण झाले आहेत.

## राजाराम पूल ते वडगाव पूल , धायरी स्वारगेट मेट्रोसाठीही पाठपुरावा !

या भागातील वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यासाठी ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनीही पुणे महानगरपालिका व वरिष्ठाकडे पाठपुरावा केला . त्यास यश आले.कोणत्याही कामासाठी श्रेय वाद करण्याचे टाळतात. हीच त्यांची मोठी खासीयत आहे.

## बांधकाम,शेती , बँकिंग, व्यापार क्षेत्रातही आवड

राजकारण म्हटलं की वेळ हा नसतोच मात्र ह्या या सर्व व्यापातून ॲड. प्रसन्नदादादा जगताप यांनी व्यवसायाकडे मात्र सातत्याने लक्ष दिले आहे. स्वतः शेतात जाऊन प्रत्यक्ष वस्तू स्थिती जाणून घेण्यासाठी प्रयत्न केला आहे.रिअल इस्टेट, बिल्डर, बँकिंग क्षेत्रातील त्यांनी नशीब आजमवले आहे. नेता म्हणून ओळख पुण्या अगोदर त्यांनी व्यावसायिक ही ओळख निर्माण केली आहे. मात्र जनतेच्या मनात बसलेला नेता कायमस्वरूपी राजकारणात पुढेच असतो. अगदी तसाच प्रत्यय प्रसन्नदादा जगताप यांना जनतेकडून प्रेमाचा आशीर्वाद मिळत आला आहे. प्रभाग रचनेमध्ये वारंवार प्रभाग बदलले गेले तरीही ॲड. प्रसन्नदादा जगताप यांना जनतेने कायमच सेवेची संधी दिली आहे. तळागाळापर्यंत असलेला जनसंपर्क आणि काम करण्याची जिद्द यामुळे राजकीय पटलावर त्यांचे वलय हे शीर्षस्थानी आहे.

## प्रसन्नदादां "आमदार "व्हावे ही कार्यकर्त्यांची इच्छा

गेले तीस वर्षाहून अधिक काळ पुणे महानगरपालिकेमध्ये राजकारण करणारे ॲड. प्रसन्न दादा जगताप यांनी आमदार व्हावे अशी त्यांच्या लाखो कार्यकर्त्यांची मागणी सातत्याने होत असते. सिंहगड रोड ,खडकवासला विधानसभा मतदारसंघामध्ये त्यांचा मोठा जनसंपर्क असल्यामुळे अनेकांना त्यांनी आमदार व्हावे अशी इच्छा प्रकट केली आहे. मागील विधानसभा निवडणुकीवेळी त्यांचे नाव चर्चेला आले होते . विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी जोरदार तयारी त्यांनी केली होती. मात्र दोन्ही उमेदवारांच्या विजयासाठी त्यांनी मनापासून प्रयत्न केले प्रयत्न केले.आणि मोठ्या मताधिक्यासह विजयश्री खेचून आणली.अशा या जनतेच्या लाडक्या नेत्यास मोठी संधी मिळावी.त्यांच्या ह्या समर्पणाचं फळ पक्ष त्यांना लवकरच देईल अशी ही अपेक्षा सर्व कार्यकर्त्यांना वाटत आहे..



आई जगदंबा आपणास निरोगी आयुष्य देवो हीच सदिच्छा!!!

**दादांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा.**

शब्दांकन, लेखन : **लक्ष्मण साबळे - 8605284272**

# ही गुलाबी हवा वेड लावी जीवा



माझं पत्र वाचून त्वरेने येण्याचं कळवताचं, प्रकृतीत वासंतिक उत्सवाचे वारे वाहू लागलेत. गुलाबी हवेच्या धुंदीला जोर येऊ लागलाय. अंगाखांद्यावर निसर्गाला खेळवत येणाऱ्या, वसंताच्या खुणा जागोजागी दिसू लागल्या की, ऋतूला लागलेले डोहाळे, तिच्या सृजनाच्या वेळा, फुलांच्या रंगीत ताफ्यातले गंध झेलीत माहेराला येतात. मनमोहक सडा रांगोळीत सजलेली अवनी, नवी नवेली नवरी दिसू लागते. मिले सूर मेरा तुम्हारा म्हणतं, आपणही सोहळ्याचा भाग होतो. विविध रंगाच्या, सुवासिक फुलांतला ऋतू मिलनाचा उत्सव मोठ्यांपासून लहानांपर्यंत, नवदाम्पत्यांपासून प्रेमात पडलेल्यांना भारावून टाकतो. कोकिळ धून ऐकताना, तान छेडित येणारे प्रेमदिवस मनाला भुरळ घालतात. प्रेम सनावाची गोष्टचं भारी आहे. प्रेम करावं, प्रेमात पडावं या स्थितीत आपल्या आवडत्या व्यक्तीचा सहवास लाभला तर आस्मान ठेंगणं होईल. यास्तव प्रेमासाठी आतूर जगातली कुठलीही सुंदर फुलं देठापासून मनमौजी करायला तयार होतील.

डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीपासूनचं जाणवू लागलेला हवेतला बदल, बोचऱ्या शीतलहरी रोमांच उभे करतात अंगावर. त्याचवेळी आठवणींच्या पसाऱ्यातली एक खोल हृद्र आठवण हलकेचं वर येते. विचारांचं वादळ, द्दष्ट आठवांचा मेळा, गच्च मिठीतली अनाहत भेट, अहाऽहा... तुझ्यासोबत घालवलेले बारमाही ऋतू संसाराचा पट उलगडतात, तेव्हा अमिताभची गाणी आठवून, आवडू लागतात. तुम होते तो ऐसा होता, तुम होते तो ऐसा होता. त्यावेळच्या त्याच्या बऱ्याचशा चित्रपटाची दिवानी होते. नयनरम्य गुलाब बागा, बर्फाच्छादित प्रदेशावर आधारित गाण्यांचा सिलसिला अहाऽहा... यावर आपल्या भेटीदाखल तू दिलेला लाल-गुलाबी गुलाबांचा बुके. सात दिन का साथ म्हणत प्रेमाच्या सात वैशिष्टपूर्ण गुलाबी विश्वातलं तुझं माझं आणि गुलाबांच राज्य कसं विसरेन मी. मला पाहताच माझं नामकरण गुलाबो करून टाकल होतस. आणि त्यावर तुला सुचलेली हिंदी कविता म्हणजे माझा आनंद गगनात मावत नव्हता...

“सुबह के महके हूए ख्वाबों के साथ,  
मेरी सांसों में तुम्हारी सांसों की  
धीमी खुशबू समाने के बाद,  
इत्र भी बेअसर हो गया...  
गुलाबो, तुम्हारी उसी खूशबू में  
पता ही नहीं चला तुम्हारे जाने का...  
जब आँख खुली,  
तो पाया, खाली कमरा, खाली घर, और टुटा हुआ दिल...  
अब दिन ढलते ही, गुलाबो तेरी याद दिला देता है,  
उन्ही हसीन दिनों की तरह,  
हर लम्हा जो दिल को जगमगाता है...  
उस रोशनी से चमक ऊठती हैं,  
ऐसे ही कुछ और सपनों भरी दुनिया.  
जिन सपनों से कायनात मुकम्मल है...  
वैसे ही...गुलाबो आज मन के कोरे कागज पर,  
लिखे है कुछ गुलाबी लफ्ज...  
जिन लफ्जो में सिर्फ तुम बसी हो...  
कुछ सूर, कुछ आरोह, अवरोह...  
और उन में सजा प्रेमगीत...  
जिसमे लिखा है खामोश अफसाना  
पर शोर के इस अंतराल में,  
कौन सुनता है खामोशी की सदा...! कौन  
सुनता हैं खामोशी की सदा....!

निस्सीम भक्तीने देवाला वाहिलेल्या फुलातं जर भक्तिभाव असतो तर प्रेमाने दिलेल्या गुलाबांमध्ये प्रेमभाव असायलाचं हवा, हा... हा... तुझा वात्रटपणा, तुझ्या या...या असल्या फिलॉसॉफीकल प्रेमशास्त्राच्या प्रेमात पडले मी. व्हॅलेंटाईन दिवसाच्या निमित्ताने तू, मी आणि या गुलाबांची आठवण आजही ताजी आहे, जी आपल्या प्रेम कहाणीची सुरुवात आहे.

श्रद्धा, प्रेम, समर्पणाचं प्रतीक असलेल्या गुलाबांची तुला भारीचं हौस होती...! लाल, मिश्रगुलाबी, पिवळा अन् पांढरा, न चुकता आणलेला कळीदार गुच्छ पाहून वरवर नाराजी जरी दाखवली, तरी आतून माझ्या मनाचं पिंपळपान खूश होई. ‘ही गुलाबी हवा वेड लावी जीवा’ अवस्थेपर्यंत, अय्यौऽ माझ्यासाठी एव...ढा ऽऽ मोठा फुलांचा बुके. बाई गं्.! केवढं हे प्रेम! हुरळून जाणार नाहीतर काय मी.! मग मैत्रिणींनाही मस्करीचा ऊत येई. विविध छटेतल्या गुलाबाच्या रंगाचा टवटवीतपणा चेहऱ्यावर आपसूक येई. आपल्या नजर भेटीतल्या पहिल्या वहिल्या गुलाबापासून, लग्नात वधूवरांनी घातलेला पाकळ्यांचा हार, ते आजचं यशस्वी सहजीवन गुलाबात सामावलयं. साथ देत आलाय हा गुलाब. फुलांचा राजा असला, तरी हृदयावर अधिराज्य गाजवावे ते यानेचं. म्हणूनचं की काय, वय वाढलं, नाती वृद्धिंगत झाली, इच्छांना पूर्णत्व आलं, तरी एक गुलाब तुझ्यासाठी कायमचं जपत आलेय माझ्या मनात. याच्या कोमल दलाचा रंग उतरतो वहीच्या पानात. अजूनही कोपरा न् कोपरा दरवळतो स्नेहाचा. सदैव उतरवित रंग प्रेमाचा. आठवणीत साठलेल्या जुन्या गोष्टी चंदनासारख्या गंध पसरवत येतात. एक वर्षी व्हॅलेंटाईन डे ला तू चारोळी करून माझं उरलं सुरलेलं प्रेम जिंकलं होतसं. काही आठवतयं का? तू म्हणत होतास की,

तिची माया आभाळाशी,  
बोलता बोलता संवाद साधते ती,  
सहज दुसऱ्यांशी.  
त्यावर मित्रांनी माझा मोठेपणा समजावतं

तुला चार ओळी सुचवल्या होत्या...

वेडा आहेस, जाणलं नाहीस तू स्वत:शी.  
दोनशब्द बोलण्यासाठी, घालव संध्याकाळ

तू जराशी तुझं गुलाबाच्या लाल रंगासारख गहिर प्रेम पाहताच लाजत, मुरडत का होईना माझ्याही त्यावर प्रतिक्रिया होत्या.

बंदिस्त कुपीतून येतो,  
जसा सुगंधित परीमळ  
तव कुशीत मज मिळावा  
जणू प्रेमानंद निर्मळ.  
अलवार यावे जवळ,  
केसावरूनी फिरवावा हात.  
मग आपुल्या गुजगोष्टींनी,  
बघ रात्रही टाकेल कात.  
ओठावर नाव तुझे रे,  
मी सांगून जाते काही.  
डोळ्यांत पाहूनी तुझिया,  
मी बोलून जाते काही.  
मी नको नको म्हणताना,  
तू हात धरितो कान्हा.  
एकांत पुरव जरासा,  
मी येईन पुन्हा पुन्हा.  
तू हसूनी टाळून देतो,  
पाशात अलिंगनाच्या.  
श्वासाचे भार सहाते  
त्या रात्री मिलनाच्या.  
मायावी गुलाबी थंडीच्या,  
गालाशी मादक खुणा.  
फिरूनी तुझी याद येता,  
तू जवळी हवा साजणा.

आजूबाजूला गुलाबी वारे घोंघावत असताना, मनात उठलेल्या कारंज्यांना आवरणं कठीण आहे. माझ्याकडच्या बकेट लिस्ट मधल्या यादीत एका नव्या गुलाबाची भर पडेल. संध्याकाळपासूनचं तुझ्या वाटेवर डोळे लावून बसली आहे तुझी गुलाबो.





दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

## वार्ताहर नेमणे आहे

पुणे आणि जिल्ह्यात लोकप्रिय दै.आरंभ पर्वसाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर वार्ताहर नेमणे आहेत.

सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व
दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा

### पुणे जिल्हा

इंदापूर शहर, इंदापूर ग्रामीण, बारामती, उरुळी कांचन, यवत, केडगाव, सुपा, भिगवण, सासवड, पुरंदर,जेजुरी, नीरा, सोमेश्वर, माळेगाव, भोर, वेल्हा. चाकण, राजगुरूनगर, मंचर, जुन्नर, घोडेगाव, लोणी काळभोर

### पुणे शहर

धायरी, स्वारगेट, हडपसर, कॅम्प, वडगाव बुद्रुक, पर्वती, डेक्कन, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा

इच्छुकांनी आपला बायोडाटा खालील ई-मेल वर पाठवावा.

aparvinfo@gmail.com

### वार्ताहरांना मिळणाऱ्या सुविधा

आयडीकार्ड, नियुक्तीपत्र, युट्युबसाठी लागणारा माईक




(टीप - वरील गोष्टी देण्यापूर्वी किमान एक महिने काम करणे आवश्यक. आपले काम बघून पुढील निर्णय घेतला जाईल.)

दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

# एआयसी-एमआयटी-एडीटीच्या स्टुडंट इनोव्हेटिव्ह प्रोग्रामचे यश



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

शालेय विद्यार्थ्यांमधील उद्यमशीलता आणि नवनिर्मितीला चालना देण्यासाठी एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठातील अटल इनक्युबेशन सेंटर (एआईसी) द्वारे अटल टिंकरिंग लॅब स्टुडंट इनोव्हेटिव्ह प्रोग्राम (एटीएल-एसआईपी) राबविला जात असून, चालू शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र तथा छत्तीसगढमधील ९ शाळांचे १४ प्रकल्प मंजुरीसाठी नीती आयोगाकडे पाठविण्यात आले आहे. अंतिम मंजुरी नंतर सहभागी चमू आंतरराष्ट्रीय उद्योगसमूह डसॉल्ट सिस्टम्स यांच्या साह्याने त्यांचे प्रकल्प विकसित करू शकणार आहेत.

एआईसी -एमआईटी एडीटी इनक्यूबेटर फोरमच्या माध्यमातून ९ शाळांमधील १५ संघांची निवड अटल टिंकरिंग लॅब स्टुडंट इनोव्हेटिव्ह प्रोग्राममध्ये करण्यात आली. या सर्व संघाचे अंतिम ऑनलाइन प्रकल्प सादरीकरण आणि परीक्षण ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आले होते. तत्पूर्वी, निवड झालेल्या शालेय चमूसाठी विशेष प्रशिक्षण वर्ग, ऑनलाईन तसेच ऑफलाईन मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून प्रशिक्षणार्थींना त्यांच्या बीज कल्पनांमधुन उद्यमशील स्टार्टअप तयार करण्याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा.डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित ऑनलाइन सादरीकरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एआयसी-एमआयटीएडीटी इनक्यूबेटर फोरमचे व्यवस्थापक कार्यक्रम नीलेश पांडव होते; तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून अभिषेक राठी आणि मनोज देशपांडे यांनी काम केले. प्रख्यात महिला उद्योजिका आणि पुणे येथील फूड मँक कन्सल्टंट्सच्या संचालिका भाग्यश्री म्हात्रे, सायंटेक इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे वरिष्ठ विपणन अभियंता विजय वाढणे, मास एंटरप्रायझेस, पुणेचे संचालक मंगेश चव्हाण आणि एमआईटी विद्यापीठाच्या आयटी विभागाचे अविनाश चौधरी यांनी परिक्षक म्हणून विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे मूल्यमापन केले.

यापूर्वी २०२२-२३ मध्ये एमआईटी एडीटी विद्यापीठाच्या बायोइंजिनियरिंग विभागाच्या मदतीने शासकीय विद्यालय, बिलासपूर द्वारे तयार केलेल्या "फूट रिलॅक्सको" प्रकल्पाने राष्ट्रीय स्तरावर प्रथम पारितोषिक सह फ्रान्स भेटीची संधी मिळाली. त्याचप्रमाणे, गत वर्षी आर सी पटेल स्कूल, पुणेच्या टीमला टाटा फाउंडेशनच्या प्रख्यात डिजिटल इम्पॅक्ट स्क्वेअरद्वारे त्यांचा प्रकल्प विकसित करण्याची संधी मिळाली होती.

### विविध विषयांवर प्रकल्प

**अपघात प्रतिबंधक यंत्रणा (स्मार्ट रोड), जलकुंभापासून सक्रिय चारकोल निर्मिती, आपत्ती निर्देशक, पथ विक्रेत्यांसाठी स्ट्रीट मार्ट, मानसिक चार्ट बोर्ड, एलपीजी गॅस लीक शील्ड, डायबेलाझल, स्वयंचलित कृषी उपकरणे इत्यादी विषयांवर प्रकल्प सादर केले. यासाठी एआईसी-एमआयटी एडीटीसह त्यांच्या विज्ञान शिक्षकांचे देखील मार्गदर्शन लाभले.**





# शिक्षण विभागात सावळा गोंधळ

- निर्लेखन न करता अज्ञात व्यक्तींकडून पवळदरा वर्ग खोली जमीनदोस्त करण्यात प्रयत्न...!
- ग्रामस्थांकडून कारवाईची मागणी

## पत्रे, पाईप गेले होते चोरीला...!

वर्ग खोलीचे पत्रे व पाईप अज्ञात व्यक्तींनी रविवारी सायंकाळी काढून ते सामान अज्ञात स्थळी ठेवण्यात आले होते मात्र सोमवारी सकाळी शिक्षण विभागाचे अधिकारी येणार असल्याची परिसरात चर्चा रंगताच झाल्यानंतर रात्री मधूनच शाळा परिसरामध्ये पत्रे व पाईप हे सामान दिसून आले. हा प्रकार खोडसाळपणा की चोरीच्या उद्देशाने केला असा प्रश्न नागरिकांना पडला असून शिक्षण विभाग काय कारवाई करणार याकडे लक्ष नागरिकांचे लक्ष लागून आहे.

**पारनेर (दै. आरंभ पर्व)**

पारनेर तालुक्यातील पोखरी येथील पवळदरा वस्तीवर असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील एका वर्ग खोलीचे निर्लेखन न करता अज्ञात व्यक्तींनी जमीनदोस्त करण्यात प्रयत्न केला आहे. या प्रकारामुळे पारनेर शिक्षण विभागात सावळा गोंधळ असल्याचे दिसून येत आहे.

याविषयी सविस्तर माहिती अशी की, पवळदरा वस्तीवर पहिली ते चौथीपर्यंत प्राथमिक शाळा असून या शाळेतील एका वर्ग खोलीचे अज्ञात व्यक्तींनी रविवारी सायंकाळच्या सुमारामध्ये शाळा खोलीचे पत्रे व पाईप काढून घेऊन शाळावर्ग जमीनदोस्त करण्याचा हा प्रकार सोमवारी सकाळी नागरिकांच्या लक्षात येतात त्यांनी पारनेर येथील शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना झालेल्या प्रकाराविषयी भ्रमणध्वनी वरून संपर्क केला.

यानंतर शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी पवळदरा शाळेला भेट देऊन माहिती घेण्याचा प्रयत्न केला. या वर्ग खोलीचे निर्लेखन न करता शिक्षण विभागाला कुठल्याही प्रकारे माहिती न देता एक वर्ग खोलीचे पत्रे व पाईप काढले आहे.

झालेल्या प्रकाराविषयी शिक्षक विभागाने या विषयी सविस्तर माहिती घेऊन ज्या व्यक्तींनी हे कृत्य केले आहे यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केलेली आहे.

या शाळेसाठी दोन वर्ग खोल्या आहेत मात्र आता एका वर्ग खोलीचे पत्रे , पाईप काढून घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची आबाळ होऊ नये यासाठी वस्तीवरील मंदिर, समाजमंदिर किंवा खासगी ठिकाणी त्यांची बसण्याची व्यवस्था करावी लागणार आहे.







दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

# गोपीचंद हिंदुजा यांच्या 'आय ॲम?' पुस्तकाचे प्रकाशन

## सर्व धर्मांमध्ये दिसून येणारी भारतीयता ही गुणसंपदा या पुस्तकात अधोरेखित झाल्याची उपराष्ट्रपतींची भावना



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
प्रसिद्ध उद्योगपती आणि हिंदुजा समूहाचे अध्यक्ष गोपीचंद पी. हिंदुजा यांनी संकलित केलेल्या 'आय ॲम?' या पुस्तकाचे प्रकाशन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या आज हस्ते झाले. उपराष्ट्रपतींच्या निवासस्थानी आयोजित एका भव्य समारंभात हा प्रकाशन सोहळा झाला. या प्रसंगी राजकीय, व्यावसायिक आणि राजनैतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

धनखड यावेळी म्हणाले, "हा खरोखरच एक विलक्षण आणि महत्त्वाचा क्षण आहे. गोपीचंद पी. हिंदुजा यांनी संकलित केलेल्या 'आय ॲम?' या विचारशील आणि चिंतनात्मक पुस्तकाचे आज प्रकाशन होत आहे. जगातील प्राचीन संस्कृतींपैकी एक अशा सनातन संस्कृतीच्या भारतभूमीत, जागतिक आध्यात्मिक केंद्रस्थानी हे पुस्तक प्रकाशित होत आहे, याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे पुस्तक भारतीयत्वाच्या सार्वत्रिक महत्त्वावर प्रकाश टाकते. भारतीयत्व ही गुणसंपदा सर्व धर्मांमध्ये दिसून येते. तिच्यानुसार आपण इतरांच्या 'सत्य' या तत्त्वाचा सन्मान करू शकतो. त्यासाठी धर्मांतर करणे आवश्यक नसते. एकता म्हणजे एकसंधता नव्हे. भारतीयत्व हे याचे उत्तम उदाहरण आहे. विविधतेतील ऐक्य याचे ते प्रतीक आहे. या माझ्या विधानांना बळकट आधार आहे. युनायटेड किंगडमचे राजे चार्ल्स तृतीय यांनी या विचारांना मान्यता दिली आहे. तसेच, संयुक्त अरब अमिरातीचे धर्मश्रद्धा, सहिष्णुता व इच्छाशक्ती या खात्याचे मंत्री शेख नह्यान बिन मुबारक अल नह्यान यांनीही या ग्रंथाचे गौरवगान केले आहे."

हिंदुजा ग्रुप ऑफ कंपनीजचे (इंडिया) अध्यक्ष अशोक पी. हिंदुजा आपल्या भाषणात म्हणाले, "विविध सांस्कृतिक आणि भौगोलिक प्रदेशांमध्ये काम करीत असताना आमच्या कुटुंबाने आपली सनातन परंपरा कायम ठेवली आहे. आमच्या व्यवसायाची भरभराट याच कारणामुळे झाली. बहुसांस्कृतिक समजूतदारपणा वाढवणे हा आमच्यासाठी नेहमीच आस्थेचा विषय राहिला आहे. गोपी (जी. पी.) यांनी अनेकदा विचार केला आहे, की धर्म हा जर एखाद्याच्या आध्यात्मिक शोधाचा एक टप्पा असेल, तर मग ज्याने सर्वांना एकत्र आणायला हवे, असा हा धर्म माणसा-माणसांत विभाजन कसे निर्माण करू शकतो? या विषयावर विविध आध्यात्मिक गुरु, विचारवंत आणि जागतिक नेत्यांशी झालेल्या संवादांमधून प्रेरणा घेत, जी. पी. यांनी हे पुस्तक संकलित केले.

यातून तरुण पिढीला या जागतिकीकरणाच्या आणि परस्पर जोडलेल्या जगात सकारात्मक दिशा मिळू शकेल."

परमार्थ निकेतन ट्रस्टचे अध्यक्ष स्वामी चिदानंद सरस्वती म्हणाले, "गोपीचंद पी. हिंदुजा यांचे हे पुस्तक सर्वसमावेशकतेबद्दल बोलते. 'मी'पासून 'आपण'पर्यंतचा हा प्रवास आहे. ही मानसिकता बाळगली तरच मानवता आजारातून आरोग्याकडे वाटचाल करू शकते. ऋग्वेदातील वसुधैव कुटुंबकम्' (संपूर्ण विश्व हे एक कुटुंब आहे) या संदेशाला हे तत्त्व मूर्त रूप देते."

या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, प्रख्यात विधिज्ञ व राज्यसभा सदस्य डॉ. अभिषेक मनु सिंघवी, ब्रिटिश उच्चायुक्त लिंडी कॅमेरॉन, 'एचडीएफसी कॅपिटल'चे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी विपुल रुंगटा, 'जिंदाल स्टील अँड पॉवर लि.'चे अध्यक्ष व लोकसभेचे सदस्य नवीन जिंदाल आदी उपस्थित होते.




# एसटी भाडेवाढी विरोधात शिवसेनेचे आंदोलन

**किरण खुडे**

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**
एसटी प्रवासासाठी केलेली १५ टक्के दरवाढ शासनाने मागे घ्यावी, या मागणीसाठी खेड तालुका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने राजगुरूनगर येथे एसटी बस स्थानकासमोर रस्त्यावर 'चक्का जाम' आंदोलन करण्यात आले.

राज्य सरकारने एसटी बस तिकीटदरात १५ टक्के भाडेवाढ केली आहे, ती सर्वसामान्य जनतेला परवडणारी नाही. राज्यातील ग्रामीण भागातील जनतेवर मोठा आर्थिक ताण आहे. राज्यभरातून या दरवाढीचा निषेध होत असून, तिकिटाची दरवाढ सर्वसामान्यांना परवडणारी नाही. सरकारने ही दरवाढ तात्काळ मागे घ्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

यावेळी जिल्हाप्रमुख आमदार बाबाजी काळे, अशोक खांडेभराड, तालुकाप्रमुख रामदास धनवटे, महिला जिल्हा संघटक विजया शिंदे, माजी तालुकाप्रमुख सुरेश चव्हाण, महिला आघाडी तालुकाप्रमुख ऊर्मिला सांडभोर, ग्राहक संरक्षण कक्ष जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब ताये, बी. के. कदम, राहुल मलघे, चैतन्य गायकवाड, अर्चना सांडभोर, पूनम पोतले, सुदाम कराळे, किरण गवारे, गणेश नाणेकर, मंगेश फ्हाड, माऊली कड, राजू चौधरी, विश्वास नेहरे, सुभाष कदम, सचिन राक्षे, नीलेश वाघमारे, दीपक कांबळे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक व प्रवासी नागरिक उपस्थित होते.

एसटी बसमधून प्रवाशांना सुविधा मिळत नाहीत. रस्त्यावर वारंवार बसेस बंद पडत असल्यामुळे प्रवाशांना तिष्ठत बसावे लागत आहे. पर्यायी बस उपलब्ध होत नाही. अनेक मार्गांवरच्या बसेस रद्द करण्यात येत असल्यामुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. सरकारने जी १५ टक्के भाडेवाढ केली आहे, ती चुकीची आहे. सर्वसामान्य माणसाला ती परवडणारी नाही. सरकारने भाडेवाढ तात्काळ मागे घ्यावी. एसटीचा प्रवास सर्वसामान्य जनतेला सुसह्य करावा. अशी मागणी यावेळी करण्यात आली. खेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रभाकर मोरे यांना शिवसैनिकांनी याविषयीचे निवेदन दिले.

**एसएमएफजी इंडिया क्रेडिटकडून लघु आणि छोट्या उद्योगांच्या**

# आर्थिक सुबत्तेसाठी नव्या सिनेमाचे अनावरण



**नाशिक (दै. आरंभ पर्व)**
एसएमएफजी या प्रसिद्ध कंपनीने नुकतेच आपल्या कार्याची महती सांगणा-या माहिती नव्या सिनेमाचे अनावरण केले. व्यवसायवृद्धीसाठी आशा, परिवर्तन तसेच अमर्यादित बाबी कितपत यशस्वी ठरतात यावर हा सिनेमा आधारलेला आहे. लघु तसेच छोटेखानी व्यवसायात गुंतलेल्या व्यावसायिकांना कर्जप्राप्तीची मदत मिळाल्यास त्यांच्या स्वप्नांना गरुडझेप मिळते, हा महत्त्वकांक्षी संदेश कंपनीने या सिनेमातून दिला आहे. रिटेल व्यवसाय करणा-या व्यावसियाकाची सिनेमात कथा मांडली आहे. हा व्यावसायिक आपला व्यवसाय मोठा करण्याची महत्त्वकांक्षा बाळगतो.

लयबद्ध संगीत आणि मानवी भावभावनांच्या सुरेख मिलापातून सिनेमाची कथा उलगडते. आपला व्यवसाय वाढवण्यासाठी एसएमएफजी इंडिया क्रेडिट कंपनी व्यावसिकाला कर्ज स्वरुपात मदत करते. या आर्थिक मदतीमुळे व्यावसायिकाच्या संपूर्ण आयुष्यालाच कलाटणी मिळते. व्यावसियाकाची उत्तरोत्तर आर्थिक प्रगती होते.

तो यशस्वी व्यावसायिक होतो. मोठी स्वप्ने उराशी बाळगणा-या व्यावसायिकाचे आर्थिक सबलीकरण कसे घडते ही मनोरंजक कथा सिनेमातील प्रत्येक टप्प्यावर मांडली आहे. या सिनेमाबद्दल एसएमएफजी इंडिया क्रेडिटचे मुख्य व्यापार अधिकारी श्री. अजय प्रतीक म्हणाले ," लघु आणि मध्यम वर्गवारीतील उद्योगातून भारताला दर वर्षाला जवळपास ३० टक्क्यांपर्यंत सकल देशांतर्गत उत्पादन मिळते.

ही वर्गवारी कमवत्या वयोगटासाठी फार महत्त्वाची आहे. या व्यावसियाकांना व्यवसाय सबलीकरणाचा विकास साधण्याबदद्ल संपूर्ण माहिती नसल्याने अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. लघु उद्योग व्यावसायिकांना एसएमएफजी इंडिया क्रेडिट बिझनेस कर्ज स्वरुपात मदत करुन त्यांचे स्वप्न साकारते हे या सिनेमाचे कथानक आहे. एसएमएफजी इंडिया क्रेडिट बिझनेसकडून व्यावसायिकांना आकर्षक व्याजदर, अल्प दस्तावेज, परताव्याच्या अनेक सोयीसुविधा उपलब्ध केल्या जातात. आमच्या प्रेक्षकापर्यंत सिनेमा पोहोचवण्यासाठी संगीतमय कवितांचा सुरेख नजराणा गुंफण्यात आला आहे.

# चिंचवड येथील धनेश्वर कबड्डी संघाला विजेतेपद

**किरण खुडे**



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**
खेड तालुक्यातील मांजरेवाडी (धर्म) येथील ग्रामदैवत धर्मनाथ महाराजांच्या यात्राउत्सवानिमित्त आयोजित केलेल्या कबड्डी स्पर्धेत चिंचवड येथील धनेश्वर कबड्डी संघाने विजेतेपद मिळवले.

पुणे जिल्ह्यातील बत्तीस नामांकीत संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. कबड्डी स्पर्धेचे उद्‌घाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा समर्थ फाउंडेशनचे अध्यक्ष विजयसिंह शिंदे पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी बाजार समिती संचालक जयसिंग भोगाडे, राजगुरुनगर बँकेचे संचालक गणेश थिगळे, पंडित वाबळे, सरपंच अनिता मांजरे, मोहिनी मलघे, सदस्या कांचन मांजरे, गीता मांजरे, अनिता संपत मांजरे, सुवर्णा नाणेकर, अंकिता होले, संतोष राक्षे, सागर मांजरे, बाळासाहेब मांजरे, राहुल मलघे, श्रीकांत होले, महेश होले, राहुल थिगळे, किरण मांजरे, गणेश काशिद आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार बाबाजी काळे, अतुल देशमुख , संपत गारगोटे यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेत अतुल बेनके संघ (जुन्नर) यांचा द्वितीय क्रमांक, वेताळेश्वर कबड्डी संघ(मांजरेवाडी) यांचा तृतीय क्रमांक तर भैरवनाथ संघ (भोसरी) यांचा चतुर्थ क्रमांक आला.

बक्षीस वितरण समारंभ भगवान मांजरे, अशोक मांजरे, गणेश मांजरे, प्रवीण मांजरे, संतोष मांजरे, शंकर मांजरे, सुभाष मांजरे, रोहिदास मांजरे, रामदास मांजरे, प्रवीण मांजरे , शरद मांजरे, शिवाजी मांजरे, बबन मांजरे, संदीप मलघे, अक्षय मांजरे, सागर मांजरे, सचिन मांजरे यांच्या हस्ते झाला.

कार्यक्रमाचे संयोजन अशोक मांजरे, अजिंक्य मांजरे, प्रमोद मांजरे, गणेश कातोरे, योगेश मांजरे ,प्रथमेश मांजरे,रोहित मांजरे, प्रतीक मांजरे, आशुतोष मांजरे , सौरभ मांजरे व धर्मनाथ कबड्डी संघ, वेताळेश्वर कबड्डी संघ यांनी केले.

# सर्जिकल रोबोटिक्स अवलंबण्याच्या दिशेने मोठे पाऊल



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
वापी येथील मेरिल अकॅडमी रोबोटिक इनोव्हेशन समिट (आरआयएस) ने रोबोटिक-असिस्टेड शल्य चिकित्सा क्षेत्रात सहकार्य, संशोधन आणि नवनिर्माण करण्यासाठी भारतातील आणि जगभरातील विख्यात शल्यचिकित्सक एका व्यासपीठावर आणले. या कार्यक्रमात मिसो ला प्रदर्शित करून, मेरिलने आपल्या अविष्कारी एआय ने समृद्ध असलेल्या जॉईंट रिप्लेसमेंट रोबोटिक सिस्टीम आणि त्यांच्या शल्यचिकित्सा विषयातील अचूक कौशल्य आणि भारतातील रुग्णांचे समाधान या गोष्टी व्यासपीठावर आणल्या.

संपूर्ण समिटच्या केंद्रस्थानी मिसो होते, जे जून २०२४ मध्ये सादर करण्यात आले आणि अत्यंत कमी वेळात ते भारतातील ५० ठिकाणी स्थापित करण्यात आले. मिसो ला एआय आधारित उन्नत प्रकारची क्षमता आहे ज्यामध्ये वर्तमान वेळेतील विश्लेषण आणि अचूक अलाइनमेंट चा समावेश आहे; या सर्व कौशल्यांचे सर्व उपस्थित त्यांना सादरीकरण करण्यात आले आणि सखोल माहिती देण्यात आली. जॉईंट रिप्लेसमेंट शल्यचिकित्सेमध्ये नवीन तंत्रज्ञानाने कशाप्रकारे क्रांती आणली आहे हे उपस्थित त्यांना सादर केले.

मिसो सोबत, मेरिलचे आर अँड डी विभागातील सर्व विकासात्मक प्रकल्प समिट दरम्यान सादर करण्यात आले, ज्यामध्ये उन्नत प्रकारच्या युनी-नी रिप्लेसमेंट, टोटल हीप रिप्लेसमेंट, ट्रॉमा, आणि स्पाईन शल्यचिकित्सा या प्रकारातील प्रकल्प सादर करण्यात आले.

# थोडक्यात



## लोकमान्य फेस्टिवलची भव्य सूर्यनमस्कार स्पर्धा उत्साहात

- **सूर्यनमस्काराचा प्रचार व प्रसार करणे काळाची गरज - ॲड. गणेश सातपुते**
- **उत्तम आरोग्यासाठी रोज सूर्यनमस्कार करा - ॲड. गणेश सातपुते**

**पुणे (आरंभ पर्व) : पुणे लोकमान्य फेस्टिवल आणि मनो-वर्धन योग संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य सूर्यनमस्कार स्पर्धाचे आयोजन सदाशिव पेठ येथील 'लोकमान्य नगर उद्यान येथे करण्यात आले होते. 'अखंड सूर्यनमस्कार महायज्ञ' या अभियाना अंतर्गत ही स्पर्धा पार पडली. या अभियानाचे हे २७ वे वर्ष होते. 'रथसप्तमी व जागतिक सूर्यनमस्कार दिना' निमित्त संस्थेच्या १४७८ साधकांनी '१०८ दिवसात २७ लाख सूर्यनमस्काराचा संकल्प' पूर्ण केला. सदरील स्पर्धेत ३७५ योग साधकांनी सहभाग घेतला होता. ॲड. गणेश सातपुते यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते. महिला व पुरुष मिळून एकूण १२ गटात ही स्पर्धा पार पडली. प्रत्येक गटातल्या प्रथम तीन विजेत्या स्पर्धकांना सन्मान चिन्हाने गौरविण्यात आले. याव्यतिरिक्त 'सर्वोत्कृष्ट संस्थात्मक सहभागा' साठी प्रथम तीन संस्थांना सन्मानचिन्ह देण्यात आले. तसेच सूर्यनमस्काराचा प्रचार व प्रसार करणाऱ्या योगतज्ञान असणाऱ्या सांगलीच्या डॉ. हर्षला पटवर्धन यांना यंदाचा सूर्यदूत' पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. रुईया मूकबधिर शाळेच्या विद्यार्थीचा या कार्यक्रमात विशेष सहभाग होता. सातपुते म्हणाले की सूर्यनमस्कार हा सर्वांग सुंदर व्यायामाच्याही पलीकडे जाऊन एक तेजाची, चैतन्याची उपासना अशा दृष्टीने तो केला जावा या दृष्टीने या उपक्रम आम्ही दरवर्षी घेत असतो. भविष्यात आम्ही सूर्यनमस्काराच्या आंतरशालीय स्पर्धा पुण्यातील प्रत्येक शाळेत जाऊन घेणार आहोत. यातून आरोग्याविषयी जनजागृती करणार आहोत. रोज सूर्यनमस्कार करणे काळाची गरज आहे. उत्तम आरोग्यासाठी रोज सूर्यनमस्कार प्रत्येकाने करावा असे त्यांनी उपस्थितांना आवाहन केले. कार्यक्रमाचे आभार ॲड. गणेश सातपुते यांनी मानले तर मनोज पटवर्धन यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वराली गोखले यांनी केले.**

# डॉ. डुंबरे पाटील 'आयर्नमॅन' कुटुंबाची इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समधे नोंद

## इटलीतील आयर्नमॅन स्पर्धेत डॉक्टर पती-पत्नी, मुलगा व मुलीची विक्रमी कामगिरी; कुटुंबातील चौघांनी स्पर्धा पूर्ण करण्याची पहिलीच वेळ



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
शहरातील डॉ. डुंबरे पाटील कुटुंबाने इटलीत नुकत्याच झालेल्या '७०.३ आयर्नमॅन ट्रायथलॉन स्पर्धे मध्ये बाजी मारत पुण्याचा आणि भारताचा झेंडा जगाच्या नकाशावर रोवला आहे. हडपसरमध्ये राहणारे अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. संपत शिवाजीराव डुंबरे पाटील, त्यांच्या पत्नी रेडिओलॉजिस्ट डॉ. वैशाली डुंबरे पाटील, कन्या प्राची व मुलगा प्रसाद यांनी ही स्पर्धा निर्धारित वेळेत पूर्ण करत विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. हा विक्रम झाल्याचे मानपत्र नुकतेच इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सच्या वतीने डॉ. चित्रा जैन यांनी डुंबरे पाटील कुटुंबाला प्रदान केले.

'आयर्नमॅन ट्रायथलॉन' ही स्पर्धा इटलीतील रोमालिया येथे २२ सप्टेंबर २०२४ रोजी झाली. या स्पर्धेत डॉ. संपत, डॉ. वैशाली आणि बीजे वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथे अंतिम वर्षात शिकणारी प्राची व प्रथम वर्षात शिकणारा प्रसाद यांनी सहभाग घेतला. एड्रियाटिक समुद्रामध्ये १.९ किमी पोहणे, त्यानंतर लगेच ९० किमी सायकल चालविणे आणि २१ किमी धावणे असे या स्पर्धेचे स्वरूप होते. ही संपूर्ण स्पर्धा आठ तासात पूर्ण करण्याचे आव्हान स्पर्धकांसमोर होते.

विविध देशातील ३५०० पेक्षा जास्त स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. पोहण्याच्या वेळी समुद्रातील लाटांचा व सायकलिंगच्या वेळी प्रचंड वारा व चढ उतारांचा सामना स्पर्धकांना करावा लागला. परंतु डुंबरे-पाटील कुटुंबातील चारही सदस्यांनी शारीरिक व मानसिक आव्हानांवर मात करत अतिशय उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेसाठी चौघेही गेल्या ८ ते १० महिन्यांपासून प्रचंड मेहनत घेत होते. प्राची व प्रसाद दोघांनीही आपला अभ्यास सांभाळून स्पर्धेसाठी सरावाला वेळ दिला.

डॉ. संपत डुंबरे पाटील म्हणाले, "ही स्पर्धा आमच्या संपूर्ण कुटुंबासाठी एक अविस्मरणीय अनुभव आहे. एकाच कुटुंबातील सर्व सदस्यांनी एकाच स्पर्धेत अशी कामगिरी करणे हे केवळ भारतातीलच नव्हे, तर जगातील एकमेव उदाहरण आहे. अभ्यासाबरोबरच आपल्या शारीरिक तंदुरुस्तीसाठी मुलांनी सजग राहावे, हा या मागचा हेतू होता. व्यायाम व शरीर स्वास्थ्यासाठी एकत्र आल्यामुळे आमच्यातील फॅमिली बॉन्डिंग खूप छान झाले आहे." कु. प्राची डुंबरे पाटील म्हणाली की, "आयर्नमॅन स्पर्धेसाठी तंदुरुस्ती खूप महत्वाची असते. निर्धारित वेळेत ही स्पर्धा पूर्ण करताना आमच्या चौघांचे छान टीमवर्क झाले. या फिटनेसमुळे आम्हाला इतर गोष्टींमध्ये चांगला फायदा होत आहे. आई-वडिलांसोबत अशी आंतरराष्ट्रीय स्तरावरची स्पर्धा जिंकताना आनंद झालाच; पण त्यांच्याविषयीचा आदरही वाढला."

डॉ. चित्रा जैन यांनी इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सने डुंबरे पाटील कुटुंबाच्या विक्रमाची नोंद घेतली असून, या ऐतिहासिक कामगिरीबद्दल अभिनंदन करत असल्याचे नमूद केले. या स्पर्धेच्या तयारीसाठी योग्य मार्गदर्शन करणारे प्रशिक्षक चैतन्य वेल्हाळ, स्ट्रेंथ ट्रेनर पियूष कुमार, स्विमिंग प्रशिक्षक शुभंकर झरे, योगप्रशिक्षक आराध्या व अविनाश यांना डुंबरे-पाटील कुटुंबाकडून यावेळी सन्मानित करण्यात आले.

**"स्पर्धेच्या शेवटच्या काही दिवसात अनेक अडथळे आले. प्राचीच्या गुडघ्याला दुखापत झाल्याने तिला ३ महिने वॉकर वापरावा लागत होता. परिणामी तिचा व्यायाम नीट होत नव्हता. स्पर्धेच्या १५ दिवस आधी तिने मेहनत घेत ताकद मिळवली. प्रसादचीही बारावी व 'नीट' परीक्षेची तयारी सुरु होती. अभ्यास सांभाळून त्यानेही प्रशिक्षण पूर्ण केले व आयर्नमॅन स्पर्धेसोबतच बी. जे . वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवला.**

**मुलांना योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले, तर मुले निश्चितच त्यात यशस्वी होतात. नियमित व्यायामाचा दोन्ही मुलांना त्यांच्या अभ्यासात लक्ष केंद्रित करण्यासाठी खूप उपयोग झाला. त्यांची शारीरिक व मानसिक तंदुरुस्ती निश्चितच वाढली. या स्पर्धेच्या तयारीसाठी एकत्रित केलेला हा प्रवास आमच्यासाठी अतिशय आनंददायी व अविस्मरणीय आहे. 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'ने त्याची नोंद घेतली, याचा आम्हा सर्वांना खूप अभिमान आहे." - डॉ. वैशाली डुंबरे पाटील, रेडिओलॉजिस्ट**